# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०३.२०२५

जिल्हा : सांगली

| मागील आठवड्यातील हवामान (२२.०३.२०२५ ते २८.०३.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९.०३.२०२५ ते ०२.०४.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | दिनांक | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | २ | ५ | ८ | ४ | २ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३७ | ३८ | ३६ | ३६ | ३६ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २१ | २३ | २४ | २४ | २४ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ३ | ३ | ३ | ३ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७१ | ७२ | ७१ | ७१ | ७२ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४५ | ४६ | ४५ | ४५ | ४६ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १२ | १३ | ४ | ३ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | ३५० | ३५५ | ० | २३० | ३५३ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक २९ मार्च ते २ एप्रिल दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक २९ मार्च ते २ एप्रिल दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये पुढील ५ दिवस कमाल तापमान ३६.० ते ३८.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमान २१.० ते २४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ७१ ते ७२% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ४५ ते ४६% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०३ ते १३ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ४ ते १० एप्रिल, २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त तर किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | | सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक २९ व ३० मार्च रोजी तुरळक ठिकाणी मेघर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ जिल्ह्यामध्ये **२९ मार्च ते २ एप्रिल दरम्यान** तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्क झालेल्या पिकाची (ज्वारी, मका, व कांदा) काढणी व मळणी करावी व तयार शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा.<br>➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा. |
| संदेश | | मार्चमध्ये ऊस पिकास प्रती दिवस ६.०६ लिटर पाण्याची गरज असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४लिटरचा ड्रीपर) दररोज १ तास आणि ३१ मिनिटे चालू ठेवावा. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरणे ते पक्कता | ➢ **दिनांक २९ मार्च ते २ एप्रिल दरम्यान** तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या ज्वारी पिकाची मळणी करावी व तयार शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| गहू | साठवणूक | ➢ **दिनांक २९ मार्च ते २ एप्रिल दरम्यान** तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या गहू पिकाची मळणी करावी व तयार शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा.<br>➢ गहू बियाणे साठवणुकीच्या काळात सोंडेकिडीच्या नियंत्रणासाठी उन्हात वाळवलेल्या प्रती किलो बियाण्यास १० ग्रॅम याप्रमाणे वेखंड भुकटीची बीज प्रक्रिया करावी. |
| मका | पक्कता | ➢ **दिनांक २९ मार्च ते २ एप्रिल दरम्यान** तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या मका पिकाची मळणी करावी व तयार शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| भुईमुग | वाढीची | ➢ कोरड्या हवामानामुळे भूईमुग पिकावर तुडतुडे, फुलकिडे व नाग आळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ उन्हाळी भुईमूग पिकास जमिनीच्या मगदूराप्रमाणे ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. |
| ऊस | वाढीची | ➢ ६ ते ८ आठवड्यांच्या सुरु उसाला नत्र खतांचा दुसरा हप्ता ४०% नत्र (१०० किलो नत्र म्हणजेच हेक्टरी २१७ किलो युरिया) द्यावा. |
| द्राक्ष | मणी विकसित होणे | अ. जर माती वाफसा (क्षेत्र क्षमता) स्थितीत असेल, तर द्राक्षबागेला पाणी देऊ नका.<br>ब. बांध ओलसर ठेवण्यासाठी आच्छादन (मल्चिंग) करावे. यामुळे बांधाच्या पृष्ठभागावरून होणाऱ्या आर्द्रतेच्या बाष्पीभवनामुळे मुळांच्या परिसरात क्षारता वाढण्यास प्रतिबंध होईल.<br>क. वेरायझन टप्प्यानंतर ते परिपक्वता येईपर्यंत, ठिबक सिंचनाद्वारे प्रतिदिन ११,९०० ते १४,४५० लिटर प्रति एकर पाणी द्यावे. |

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ड. ज्या ठिकाणी तापमान ३५°C पेक्षा जास्त होत आहे, तिथे द्राक्ष घडातील मन्यांमध्ये जास्त गोडवा यावा म्हणून परिपक्वता ते कापणी या टप्प्यात पाणी रोखू नये, कारण यामुळे द्राक्ष घड सैल होईल व उत्पादनाच्या गुणवत्तेवर परिणाम होईल. हे विशेषतः हलक्या जमिनीत आणि क्षारयुक्त जमिनीत लागू होते. |
| मिरची | फुलोरा | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान आढळल्यामुळे मिरची पिकावर फुलकिडे या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. फुलकिडे हे पानाच्या खालच्या व वरच्या बाजूस राहतात आणि पानातील रस शोषून घेतात त्यामुळे पानाच्या कडा वरील बाजूस वळतात. पाने लहान होतात यालाच बोकड्या किंवा चुरडा-मुरडा असे म्हणतात. त्याच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ % एस.एल. २.५ मिली किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. २० मिली. या किटकनाशकाच्या आलटून पालटून फवारण्या कराव्यात.<br>➢ फवारणी करतांना पावसाळी वातावरणामध्ये चिकट द्रव्याचा (०.१%) वापर जरूर करावा.<br>➢ शेतामध्ये निळे चिकट सापळे एकरी २० ते २५ या प्रमाणात वापरावे. |
| नारळ | वाढीची | ➢ प्रखर उन्हाची तीव्रता वाढली असून कमाल तापमान ३९.० अंश सेल्सिअसपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. त्यामुळे नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांचे प्रखर उन्हापासून संरक्षण करण्यासाठी शेड नेटच्या सहाय्याने सावलीची व्यवस्था करा. |
| दोडका | फुलोरा | ➢ उन्हाळी वेलवर्गीय भाजीपाला पिकांस खुरपणी देऊन नत्र खताचा दूसरा हप्ता द्यावा<br>➢ वेलवर्गीय पिकांना आधार देण्याचे काम पूर्ण करावे. |
| आंबा | फळ वाढीची | ➢ साधारणतः अंड्याच्या आकाराच्या फळांना फळ माशीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. फळगळ झालेली असल्यास पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत व रक्षक फळ माशी सापळे @ २ प्रती एकर या प्रमाणात लावावेत. |
| टोमॅटो | वाढीची | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान राहिल्याने काही ठिकाणी टोमॅटो पिकावर पांढरी माशी व फुलकिड्यांच्या प्रादुर्भाव दिसून येत आहे नियंत्रणासाठी कोरडे हवामान असताना इमिडाक्लोप्रीड ०.५ मि.लि. प्रती लिटर पाण्यातून फवारावे.<br>➢ दिनांक २९ व ३० मार्च रोजी तुरळक ठिकाणी जोरदार वाऱ्यासाह हलक्या पावसाची शक्यता असल्याने टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून टोमॅटो रोपांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| पशुधन | वाढीची | ➢ लाळ खुरकुत रोगापासून बचावासाठी निरोगी जनावरांना लाळ खुरकुत रोगाची रोगप्रतिबंधक लस मार्च महिन्यामध्ये अधिकृत पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने टोचून घ्यावी. ३ महिन्याच्या आतील तसेच गाभण जनावरांना लस देणे टाळावे.<br>**जनावरांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पुढील उपाय करावेत...**<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गायींपेक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात डुंबन्यास सोडावे.<br>➢ जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत. शक्य असल्यास दिवसातून ४ ते ५ वेळा त्याच्या अंगावर पाणी फवारावे.<br>➢ जनावरांना पुरेशे, शुद्ध व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना पुरेसा प्रथिनेयुक्त व हिरवा चारा आणि खनिजमिश्रण द्यावे.<br>➢ दुपारच्या वेळेस जनावरे चारावयास नेऊ नयेत. |
| पोल्ट्री पक्षी | वाढीची | पोल्ट्रीमधील पक्षांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पोल्ट्रीच्या बाजूने बारदाणे लावावेत व त्यावर वारंवार पाणी शिंपडावे जेणेकरून आतील तापमान कमी राहण्यास मदत होईल.वीतसेच पोल्ट्रीमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्या . |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई

**ठिकाण : कोल्हापूर**
**दि. : २८.०३.२०२५**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**